त.मु.अ.-१
त.मु.अ.-२
विशेष अधिकारी
अधिकारी
क्रमांक २८८०
दिनांक २८/१०/२१


**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.२६१-अ, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०४०४८९ Email ID : doser5.pwd@maharashtra.gov.in


क्रमांक: संकीर्ण-२०२०/प्र. क्र.३४/रो. आ.१ दिनांक:२६ ऑक्टोबर,२०२१.

2 7 OCT 2021

१) मुख्य अभियंता,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,मुंबई/ पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती.
२) मुख्य अभियंता,(विद्युत) सा. बां. प्रादेशिक विभाग, मुंबई.
३) मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई.
४) मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, सा. बां. विभाग, मुंबई.
५) संचालक, उपवने व उद्याने, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ.

**विषय** :- अधीसंख्य पदावर सेवा वर्ग केलेले कर्मचारी हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना सेवानिवृत्तीवेतन देण्याबाबत.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयानुषंगाने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी या कार्यालयातील श्री. रविंद्र गणपत मालवणकर, शिपाई हे अधिसंख्य पदावर सेवा वर्ग केलेले कर्मचारी सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांना सेवानिवृत्तिवेतन देय आहे किंवा कसे ? तसेच सेवानिवृत्ती वेतन प्रकरणाबाबत कोणती कार्यवाही करावी याबाबत मार्गदर्शन पर आदेश होणेबावत विनंती करण्यात आली होती. प्रस्तुत प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे खालील अभिप्राय अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी यांना कळविण्यात आले आहेत.

"जे अधिकारी/कर्मचारी अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न करताच सेवेतून नियतवयोमानुसार अथवा स्वेच्छा निवृत्तीने सेवानिवृत्त झाले असतील अथवा मृत्यू पावले असतील अथवा अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास असमर्थ असतील, अशा सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचा-यांना/ मृत्यू पावलेल्या अधिकारी/कर्मचा-यांच्या कुटुंबियांना त्यांचे सेवानिवृत्तीविषयक लाभ अनुज्ञेय करावेत किंवा कसे याबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी दिनांक १५.०६.२०२० च्या शासन निर्णयान्वये एक अभ्यास गट स्थापन करण्यात आला आहे. या अभ्यास गटाच्या शिफारसी शासनास प्राप्त झाल्यानंतर अशा अधिकारी व कर्मचा-यांना

द्यावयाच्या सेवाविषयक व सेवानिवृत्ती विषयक लाभांबाबत या विभागामार्फत योग्य तो निर्णय घेण्यात येईल. श्री. रविंद्र मालवणकर हे जात वैधता प्रमाणपत्र सादर न करताच सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांना तूर्तास कोणतेही लाभ अनुज्ञेय ठरत नाहीत."

वरील वस्तुस्थिती माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येत आहे. तदनुषंगाने आपल्या विभाग/ मंडळ कार्यालयांकडील विषयाधीन समान प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(दे. सां. भगुरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत:**- निवडनस्ती (रोजंदारी आस्थापना-१)